12 MAR 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ अर्थसंकल्पात संशोधनाला चालना

## ७ कोटी ४७ लाख तुटीचा अर्थसंकल्प एकमताने मंजूर : संशोधनासाठी २.७५ कोटींची तरतूद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा २०२२-२३ च्या वार्षिक अर्थसंकल्पात ५३१.१९ कोटींची रक्कत जमा आहे. ५३८.६६ कोटीचा खर्च अपेक्षित होता. परंतू अधिसभा सदस्य ॲड. धैर्यशील पाटील यांनी ७.४७ कोटी तुटीचा अर्थसंकल्प शुक्रवारी झालेल्या अधिसभेत सादर केला. ही तूट विद्यापीठ निधीतील शिलकेतून भरून काढली जाणार आहे. या अर्थसंकल्प संशोधनावर भरीव २.७५ कोटीची तरतूद केली आहे. संशोधनाला चालना देणारा व सर्वसमावेशक अर्थसंकल्प असल्याने अधिसभा सदस्यांनी या अर्थसंकल्पाचे स्वागत करीत एकमताने मंजूर केला. अधिसभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

ॲड. धैर्यशील पाटील यांनी ऑनलाईन पद्धतीने मुद्देसुदपणे वार्षिक अर्थसंकल्पाचे सादरीकरण केले. पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून अर्थसंकल्प मांडल्याने अधिसभा सदस्यांवर त्याचा चांगलाच प्रभाव पडला. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे ॲड. पाटील यांनी दिली. प्रशासकीय विभागाकडून ३९.८४ कोटी, शास्त्र अधिविभागांकडून ३.५६ कोटी, इतर अधिविभागांकडून २.३८ कोटी जमा होण्याची अपेक्षा आहे. इतर उपक्रमांमधून २५.४० कोटी असे एकूण ७०.४४ कोटी विद्यापीठाच्या स्वनिधीत जमा होणे अपेक्षित आहे. घसारा निधीच्या शिल्लक रक्कमेतून १६.६० कोटी जमा होणे अपेक्षित आहे. प्रस्तावित खर्चामध्ये प्रशासकीय विभागाकडून ६०.८० कोटी, शास्त्र अधिविभाग ५.६५ कोटी, इतर अधिविभाग ५.४८ कोटी, विविध सेवा व इतर उपक्रम ४४.०३ कोटी असा विद्यापीठाच्या स्वनिधीमधील ११६.१४ कोटी खर्च अपेक्षित आहे. वेतन अनुदान खर्च १३०.२९ कोटी, तर विविध वित्तीय संस्थांकडून मिळणाऱ्या निधीमधून खर्चासाठी १३०.२९ कोटी, तर विविध वित्तीय संस्थांकडून मिळणाऱ्या निधीमधून खर्चासाठी ९.३१ कोटी तसेच संशोधन व विकास निधी ३०.२० कोटी व घसारा निधी १६.६०, निलंबन लेखे २३६.११ कोटी अशी एकूण ५३८.६५ कोटी खर्चासाठी तरतूद प्रस्तावित आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यपदी निवड झाल्याचे पत्र डॉ. योजना जुगळे यांना देऊन सन्मान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.**

### योजना जुगळे यांची व्यवस्थापन सदस्यपदी निवड

प्राचार्य गटातून विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती प्रवर्गातून प्राचार्य डॉ. योजना जुगळे यांची व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यपदी निवड केली. सभागृहात कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते निवडीचे पत्र देऊन त्यांचा सन्मान केला.

### अर्थसंकल्पातील काही ठळक मुद्दे

- संगणक प्रणाली विकसित करणे : १ कोटी
- विद्यापीठ मेरीट स्कॉलरशिप: ५० लाख
- विद्यापीठातील ३७ परदेशी विद्यार्थी सोयी सुविधा : ४८.०६ लाख
- क्रीडा विकास : १ कोटी
- माजी विद्यार्थी मेळावा : ५ लाख
- आझादी का अमृत महोत्सव : २५ लाख
- सेंटर फॉर क्लायमॅट चेंज : २० लाख
- यशवंतराव चव्हाण रूरल डेव्हलपमेंट रिसर्च सेंटर इमारत : १.५० कोटी
- पाणीपुरवठा : ९५ लाख
- फायर सेफ्टी : १ कोटी
- गोल्डन् जुबली रिसर्च स्कॉलरशिप : ८० लाख
- हिरक महोत्सवी वर्षानिमित्त संगीत रजनी : ३ लाख
- विद्यापीठ परिसर सुशोभिकरण : १ कोटी
- नवीन रस्ते : १ कोटी
- दिव्यांग सुविधा : १.२५ कोटी
- विद्यार्थी वसतिगृह : २.३५ कोटी

लोकमत

# विद्यापीठाला राज्य सरकारकडून दहा कोटीचा निधी

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** राज्य सरकारने शुक्रवारी अर्थसंकल्पामध्ये शिवाजी विद्यापीठाला दहा कोटी रुपयांचा निधी जाहीर केला. त्यातून विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रशाला, राजर्षी छत्रपती शाहू महाराज संशोधन केंद्र व संग्रहालयाच्या आधुनिकीकरण, विकासाला मदत होणार आहे. विद्यापीठाने सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रशाला आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज संशोधन केंद्राची सुरुवात केली. ग्रामविकास प्रशालेच्या माध्यमातून एमबीए., एमएसडब्ल्यू, रूरल टेक्नॉलॉजी, आदी विविध सहा अभ्यासक्रम राबविण्यात येतात. ग्रामीण भागातील तंत्रज्ञानाला बळ देण्याचे काम करण्यात येते. सध्या या प्रशालेचे कामकाज मानव्यशास्त्र विभागाच्या इमारतीतून चालते. आता निधी मिळणार असल्याने केंद्रांच्या काम आणि विकासाची गती वाढणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 MAR 2022

लोकमत

# संशोधन, शैक्षणिक सुविधांवर भर

## शिवाजी विद्यापीठाचे ५३८ कोटींचे अंदाजपत्रक : इनडोअर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सची उभारणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** रिसर्च स्कॉलर होस्टेल, मेरिट स्कॉलरशिप, संशोधन योजना, क्रीडा विभागाचे वसतिगृह, दिव्यांग विद्यार्थी सुविधा आदींद्वारे संशोधन, शैक्षणिक आणि विद्यार्थी सुविधांवर शिवाजी विद्यापीठाने सन २०२२-२०२३ च्या अंदाजपत्रकामध्ये (अर्थसंकल्प) शिवाजी विद्यापीठाने भर दिला आहे. यंदाचे ५३८ कोटी ६६ लाख रुपयांचे अंदाजपत्रक अधिसभेने शुक्रवारी मंजूर केले. हे अंदाजपत्रक ७ कोटी ४७ लाख रुपये इतक्या तुटीचे आहे. ही तूट विद्यापीठ निधीतील शिलकेतून भरून काढण्यात येणार आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हे अंदाजपत्रक २७ कोटी ४४ लाखांनी वाढले आहे.

विकास, वेतन, संस्था योजना, निलंबन लेखे, देखभाल या प्रकारांत विभागलेले विद्यापीठाचे अंदाजपत्रक अधिसभा सदस्य ॲड. धैर्यशील पाटील यांनी मांडले. या अंदाजपत्रकावर अधिसभा सदस्यांनी मते, सूचना मांडल्या.

त्याच्यासह वार्षिक अहवाल, विद्यार्थी विकास विभागाच्या अहवालास मंजुरी दिली. या अंदाजपत्रकात अपेक्षित जमा रुपये ५३१ कोटी १९ लाख आणि अपेक्षित खर्च ५३८ कोटी ६६ लाख इतका आहे. त्यात ग्रंथालयाला ऑनलाईन बुक्स ॲण्ड जनरल खरेदीसाठी २ कोटी ७५ लाख, विद्यार्थिनी वसतिगृहासाठी १ कोटी ३५ लाख, तर विद्यार्थी वसतिगृहासाठी २ कोटी ३५ लाख, नवीन वसतिगृहासाठी १ कोटी २० लाख, कमवा व शिका मुलींच्या वसतिगृहातील सुविधांसाठी ३० लाख ९२ हजार, विविध खेळांकरिता इनडोअर कॉम्पलेक्ससाठी १ कोटी, रिसर्च स्कॉलर हॉस्टेलसाठी ६५ लाखांची तरतूद केली आहे. दरम्यान, वेबवेस अंदाजपत्रक प्रणालीमध्ये सर्व विभागांनी जमा, खर्चाची माहिती ऑनलाईन भरल्याने पेपरलेस काम झाले. अंदाजपत्रक मसुदा तयार करण्याच्या समितीत प्रा. भारती पाटील, एम. एस. देशमुख, सचिन पन्हाळकर यांचा समावेश होता.

### अंदाजपत्रकातील विविध तरतुदी

| | | |
|---|---|---|
| ४८ लाख<br>परदेशी विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी | ५० लाख<br>मेरिट स्कॉलरशिपसाठी | १ कोटी २५ लाख<br>दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी |
| ०१ कोटी<br>संगणक प्रणाली विकासासाठी | ०१ कोटी<br>विद्यापीठ परिसर सुशोभीकरणासाठी | २ कोटी ७५ लाख<br>वायसीएसआरडी, कॉमर्स विभागाच्या नवीन इमारतीसाठी |
| २ कोटी ७७ लाख<br>विविध उपकरणे खरेदीसाठी | ८० लाख<br>गोल्डन ज्युबली रिसर्च स्कॉलरशिपसाठी | ०१ कोटी<br>क्रीडा विभाग वसतिगृहासाठी |



### असा जमा, खर्च (कोटींत)

| विभाग | जमा | खर्च |
|---|---|---|
| प्रशासकीय | ३९.८४ | ६०.८० |
| शास्त्र | ३.५६ | ५.८३ |
| इतर अधिविभाग | २.३८ | ५.४८ |
| इतर उपक्रम | २५.४० | ४४.०३ |
| वेतन | १२४.८० | १३०.२९ |
| विविध संस्था | ११.६० | ९.३१ |
| संशोधन व विकास निधी | ३०.२० | ३०.२० |
| घसारा निधी | १६.६० | १६.६० |
| निलंबन लेखे | २७६.८० | २३६.११ |

महासत्ता एकच आवृत्ती
12 MAR 2022
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आजरा घनसाळ, काळा जिरगा सुधारित वाणांची निर्मिती

## शिवाजी विद्यापीठातील संशोधकांचे यश

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)-

**आजरा घनसाळ आणि काळा जिरगा या तांदळाच्या सुगंधी वाणांच्या सुधारित जाती शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी तयार केल्या आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ.एन.बी. गायकवाड यांनी दिली.यावेळी कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे उपस्थित होते.**

डॉ. गायकवाड म्हणाले, आजरा घनसाळ आणि काळा जिरगा या दोन सुप्रसिध्द उत्तम सुगंधित तांदळाच्या जातींचा समावेश आहे. या सुगंधी देशी वाणांमध्ये खनिजे आणि इतर पोषकतत्त्वे मोठ्या प्रमाणात आहेत. यामुळेही त्यांना बाजारात मोठी मागणी आहे. या देशी वाणांमध्ये अधिक उंची, अल्प उत्पन्न आणि परिपक्व होण्यासाठी लागणारा दीर्घ कालावधी अशा काही समस्या आहेत. यामुळेच त्यांची लागवड मर्यादित भागांमध्ये केली जाते. ही बाब लक्षात घेऊन प्रा.गायकवाड आणि अधिविभागातील संशोधक विद्यार्थी शीतलकुमार देसाई व अकेश जाधव यांनी या दोन देशी वाणांच्या अनुवांशिक गुणांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा तसेच त्यांचे उत्पादन वाढवण्याचा संशोधन प्रकल्प हाती घेतला. विविध प्रकारच्या म्युटेजेनिक एजन्टचा वापर करून या पिकांच्या सहा पिढ्यांच्या चाचण्या घेण्यात आल्या. त्यामधून अधिक उत्पादन देणारे, लवकर परिपक्व होणारे कमी उंचीचे आणि आडवे न पडणारे असे गुणधर्म असणारे वाण विकसित करण्यात संशोधकांना यश आले आहे.

या व्यतिरिक्त प्रा.गायकवाड आणि संशोधक चमूने कोल्हापूर जिल्ह्यातून ९ सुवासिक आणि ३९ असुवासिक अशा एकूण ४८ भातांच्या देशी वाणांच्या प्रजाती संकलित केल्या आहेत. २०२० आणि २०२१ या सलग दोन वर्षांच्या खरीप हंगामात त्यांनी महाराष्ट्रातील कोल्हापूर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील शेतकरी, महिला आणि पुरूषांच्या बचत गटांना या संकलित केलेल्या देशी वाणांचे संवर्धन करण्यासाठी वितरण केले आहे.

12 MAR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे संशोधनासाठी मोठी तरतूद

## ५३१ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक सादर; ७.४७ कोटी रुपयांची तूट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा २०२१-२२ चा सुधारित व २०२२-२३ शैक्षणिक वर्षाचा ५३१.१९ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प अधिसभेत सादर झाला. अपेक्षित खर्च ५३८.६६ कोटी आहे. अंदाजपत्रकात ७.४७ कोटी रुपयांची तूट असून ही विद्यापीठ निधीतील शिलकेतून भरून काढली जाणार आहे. अर्थसंकल्पात शैक्षणिक व संशोधन कार्यास २.७५ कोटींची भरघोस तरतूद केल्याने सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.

शेवटच्या अधिसभेत ॲड. धैर्यशील पाटील यांनी शुक्रवारी सुधारित व चालू वर्षाचा अर्थसंकल्प पाच विभागांत शेरोशायरी करीत सादर केला. पॉवरपाईंट प्रेझेंटेशन करताना गुगल मॅपचा वापर केला. २०२२-२३ या वर्षात प्रशासकीय विभागांकडून ३९.८४ कोटी, शास्त्र अधिविभागांकडून ३.५६ कोटी, इतर अधिविभागांकडून २.२३ कोटी, इतर उपक्रमांतून २५.४० कोटी असे ७१.१८ कोटी विद्यापीठाच्या स्वनिधीत जमा अपेक्षित आहे. वेतन अनुदानापोटी शासनाकडून १२४.८० कोटी, तर वेगवेगळ्या संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी ११.६० कोटी जमा अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या संशोधन व विकास निधीतून ३०.२० कोटी रक्कम व घसारा निधीच्या शिल्लक रकमेतून १६.६० कोटी रक्कम जमेकरिता प्रस्तावित केली आहे. निलंबन लेख्यांमधून २७६.८० कोटी असे ५३१.१८ कोटी जमा होणे अपेक्षित आहे.



**शिवाजी विद्यापीठातून...**

प्रशासकीय विभाग ६०.८० कोटी, शास्त्र अधिविभाग ५.८३ कोटी, इतर अधिविभाग ५.४८ कोटी, विविध सेवा व इतर उपक्रम ४४.०३ कोटी असा विद्यापीठाच्या स्वनिधीमधील ११६.१४ कोटी खर्च अपेक्षित आहे. वेतन अनुदान खर्च १३०.२९ कोटी तर विविध वित्तीय संस्थांकडून मिळणाऱ्या निधीतून खर्चासाठी ९.३१ कोटी व संशोधन व विकास निधी ३०.२० कोटी व घसारा निधी १६.६० कोटी, निलंबन लेखे २३६.११ कोटी अशी ५३८.६५ कोटी खर्चासाठी तरतूद प्रस्तावित केली आहे.

### डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाकरिता १.१३ कोटींची तरतूद

विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाकरिता आर अँड डीअंतर्गत इमारत, फर्निचर, इलेक्ट्रिकल कामांसाठी १.१३ कोटींची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. जिल्हा नियोजन समितीकडून ५० लाख रुपये मिळाले आहेत. अध्यासनाचा एक भाग पूर्ण झाल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी अधिसभेत सांगितले. याला सदस्यांनी टाळ्यांचा गजर करीत एकमताने मान्यता दिली.

**ठळक वैशिष्ट्ये...**

विद्यार्थिनी वसतिगृह १.३५ कोटी, विद्यार्थी वसतिगृहासाठी २.३५ कोटींची तरतूद केली आहे. विद्यापीठातील ३७ परदेशी विद्यार्थ्यांसाठी ४८.०६ लाखांची तरतूद केली आहे. रिसर्च स्कॉलर होस्टेल प्रलंबित कामांसाठी ६५ लाख, विद्यापीठ मेरीट स्कॉलरशिप ५० लाख, तर दिव्यांगांसाठी १.२५ कोटी, संशोधनाला चालना देण्यासाठी २.२५ कोटी, रस्ते १.४० कोटी, खेळाच्या मैदानांसाठी ४२ लाख, विद्यापीठ परिसर कम्पाऊंड बांधकाम ७० लाख, विद्यापीठ परिसर सुशोभिकरण १ कोटी, प्रस्तावित इनडोअर स्पोर्टस् कॉम्प्लेक्स १ कोटी, माजी विद्यार्थी मेळावा ५ लाख, आझादी का महोत्सव २५ लाख, सेंटर फॉर क्लायमेंट चेंज २० लाखांची तरतूद केली आहे. विद्यापीठ हीरक महोत्सवी वर्षानिमित्त संगीत व नाट्यशास्त्र विभागाकडील शाहू संगीत रजनीसाठी ३ लाख, गोल्डन ज्युबिली रिसर्च स्कॉलरशिप ८० लाख, सोलर सिस्टीम ७५ लाख, क्रीडा विभाग वसतिगृहाकरिता १ कोटींची तरतूद केली आहे.

**अधिसभेत ५५ पैकी ५ ठराव मंजूर**

विद्यापीठाची अधिसभा सुमारे ९ तास चालली. अधिसभेत ५५ ठराव मांडले. त्यापैकी ५ ठराव मंजूर झाले, तर ५० ठराव मागे घेण्यात आले. राज्यपाल यांच्या वक्तव्यास विरोध, सेवा ज्येष्ठता ठरविणे, अधिकाऱ्यांचा गोपनीय अहवाल आदी प्रश्नांवर ही सभा गाजली.

**प्रशासन धारेवर**

कार्यकाल पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांचा गोपनीय अहवाल, नेट-सेट, पीएच.डी. नसताना शारीरिक शिक्षण संचालक नियुक्ती, शिक्षकांची सेवा ज्येष्ठता, 'कॅस' निश्चिती प्रस्ताव, कुलसचिव निवड प्रश्नांवरून सदस्यांनी प्रशासनास धारेवर धरले. डॉ. प्रताप पाटील यांनी शारीरिक शिक्षण संचालक नियुक्तीत कोट्यवधीचा अपहार झाल्याचा आरोप केला. सेवा ज्येष्ठता प्रश्नावर डॉ. सागर डेळेकर यांनी रसायनशास्त्र विभागप्रमुख नियुक्तीचा विषय काढला. यावेळी कुलगुरूंनी सदस्यांनी केवळ प्रश्न विचारावेत, व्यक्तिगत बोलू नये, इतर गोष्टींबाबत चर्चा करू नये, असे खडेबोल सुनावले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठास १० कोटी रुपये निधी

## अर्थमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्याच्या अर्थसंकल्पात शिवाजी विद्यापीठाला दहा कोटी रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज संशोधन केंद्र व संग्रहालय संकुल, यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रशाला व अन्य विभागांतील आधुनिकीकरणासाठी त्याचा वापर केला जाणार आहे.

राजर्षी शाहू महाराज संशोधन केंद्राचे काम सुरू आहे तसेच राजर्षी शाहू महाराज संग्रहालय संकुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. या ठिकाणी विरगळसह विविध गोष्टी ठेवल्या जाणार आहेत.

पान ७ वर ▶

# शिवाजी विद्यापीठास १० कोटी रुपये निधी

**(पान ३ वरून)**यशवंतरावचव्हाण ग्रामविकास प्रशाला विभागांतर्गत एमसीए, एमबीए, एमआरएस, एमएसडब्ल्यू हे अभ्यासक्रम चालविले जातात. अर्थसंकल्पात नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीसह विविध प्रकल्पांचा प्रस्ताव पाठविले होते.

“

राज्याच्या अर्थसंकल्पात शिवाजी विद्यापीठाला दहा कोटी रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला, ही आनंदाची गोष्ट आहे. राज्य सरकारला काही प्रकल्पांचे प्रस्ताव पाठविले होते. मंजूर निधीतून सुवर्ण महोत्सव वर्षातील प्रकल्पांना गती मिळणार आहे.

**- डॉ. व्ही. एन. शिंदे,**
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

12 MAR 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पायभूत सोयी-सुविधांसाठी भरघोस तरतूद

## शिवाजी विद्यापीठाचा ५३१ कोटींचा अर्थसंकल्प सादर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा २०२२ -२३ चा अर्थसंकल्प शुक्रवारी सादर करण्यात आला. या आर्थिक वर्षाची एकूण अपेक्षित जमा ५३१.१९ कोटी रुपये असून, अपेक्षित एकूण खर्च ५३८.६६ कोटी आहे, तर अंदाजपत्रकीय तूट ७.४७ कोटी इतकी आहे. ही तूट विद्यापीठ निधीतील शिलकेतून भरून काढण्यात येणार आहे. या वेळच्या अर्थसंकल्पामध्ये शिवाजी विद्यापीठातील विविध पायभूत सोयी-सुविधांसाठी भरघोस तरतूद करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखालील सभेमध्ये प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये ॲड. धैर्यशील पाटील यांनी अर्थसंकल्प सादर केला.

वार्षिक अंदाजपत्रकाचा मसुदा तयार करण्यासाठी डॉ. भारती पाटील, डॉ. एम. एस. देशमुख आणि डॉ. सचिन पन्हाळकर यांची समिती नियुक्त करण्यात आली होती. प्रशासकीय विभागांकडून ३९.८४ कोटी, शास्त्र अधिविभागांकडून ३.५६ कोटी, इतर अधिविभागांकडून २.३८ कोटी रुपये जमा होण्याची अपेक्षा असून, इतर उपक्रमांमधून २५.४० कोटी असे एकूण ७१.१८ कोटी विद्यापीठाच्या स्वनिधीत जमा होणे अपेक्षित आहे. वेतन अनुदानापोटी शासनाकडून १२४.८० कोटी, तर वेगवेगळ्या संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी ११.६० कोटी जमा अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या संशोधन व विकास निधीतून ३०.२० कोटी इतकी रक्कम व घसारा निधीच्या शिल्लक रकमेतून १६.६० कोटी इतकी रक्कम जमेसाठी प्रस्तावित केलेली आहे.

### महत्त्वाचे मुद्दे

- शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी खरेदीसाठी ग्रंथालय विभागास २.७५ कोटी
- विद्यार्थिनी वसतिगृहासाठी एकूण १.३५ कोटी
- विद्यार्थी वसतिगृहासाठी एकूण २.३५ कोटी
- परदेशी विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधेसाठी ४८.०६ लाख
- रिसर्च स्कॉलर होस्टेलच्या प्रलंबित कामासाठी ६५ लाख
- विद्यापीठाच्या विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिरांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय उपचारासाठी १० लाख
- मेरिट स्कॉलरशिपसाठी ५० लाख
- दिव्यांगांच्या सुविधांकरिता १.२५ कोटी
- संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी १ कोटी
- संशोधनाला चालना देण्यासाठी २.२५ कोटी
- उपकरणांच्या खरेदीसाठी २.७७ कोटी
- विद्यापीठ परिसरातील रस्ते सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून १.४० कोटी,तसेच नवीन रस्ते तयार करण्यासाठी संशोधन व विकास निधीतून १ कोटी
- मैदाने सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून ४२ लाख
- विद्यापीठ परिसर सुशोभीकरण करण्यासाठी १ कोटी
- इनडोअर स्पोर्टस् कॉम्प्लेक्ससाठी १ कोटी
- माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी ५ लाख
- आजादी का महोत्सवकरिता २५ लाख
- डॉ. ग. गो. जाधव अध्यासनासाठी १.१३ कोटी
- सेंटर फॉर क्लायमेट चेंजसाठी २० लाख
- वायसीएसआरडीच्या नवीन इमारतीसाठी १.५० कोटी
- कॉमर्स अँण्ड मॅनेजमेंटच्या नवीन इमारतीसाठी १.२५ कोटी
- हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त संगीत व नाट्यशास्त्र विभागाकडील शाहू संगीत रजनीसाठी ३ लाख
- फायर सेफ्टीसाठी १ कोटी
- सोलर सिस्टीमसाठी ७५ लाख
- क्रीडा विभाग वसतिगृहासाठी १ कोटी

## शिक्षक सेवाज्येष्ठतेच्या मुद्द्यावरुन विद्यापीठ प्रशासन धारेवर

### प्रश्नोत्तराच्या तासात २८ पैकी ६ प्रश्नांवर चर्चा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेच्या मुद्द्यावरून अधिसभा सदस्यांनी प्रशासनावर प्रश्नांची सरबत्ती केली. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये २८ पैकी ६ प्रश्नांवर चर्चा झाली. अधिसभा सदस्यांना वेळेत व योग्य माहिती मिळत नसल्याची भावना काही सदस्यांनी यावेळी व्यक्त केली.



अधिसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात प्रा. मधुकर पाटील यांनी ज्या अधिकाऱ्यांचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे, त्यांच्याकडून सर्व गोपनीय अहवाल प्राप्त झाले आहेत का, असा प्रश्न केला. कार्यकाळ पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांनी पुन्हा अर्ज केले आहेत का, त्यांची निवड होईल का, असे प्रश्न अमरसिंह रजपूत यांनी उपस्थित केले. प्रताप माने यांनी निवृत्तीनंतरचे फायदे सेवानिवृत्तांनी मिळवलेत काय, असे उपप्रश्न यावेळी उपस्थित केला. डॉ. नीळकंठ खंदारे यांनी सदस्यांना सभागृहात माहिती देण्यात यावी, अशी भावना व्यक्त केली.

प्रा. मधुकर पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांत नेट-सेट किंवा पीएच.डी. नसताना शारीरिक शिक्षण संचालक म्हणून मान्यता देण्यात आली आहे का, असा प्रश्न उपस्थित केला.

यावेळी ॲड. धैर्यशील पाटील यांनी याबाबत उच्च न्यायालयाचा निर्णय असून, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ४४ जणांना मान्यता दिल्याचे सांगितले. यावेळी प्रताप पाटील म्हणाले, पात्रता नसताना निवड करणे ही विद्यापीठाची गंभीर चूक असून, १०० कोटी रुपयांहून अधिकचा घोटाळा झाल्याची शक्यता आहे. अशा प्रकारे नियुक्त्या करणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील एकमेव विद्यापीठ असल्याचा आरोपही त्यांनी केला. नियुक्त्या झाल्या असतील तर त्याची माहिती द्यावी, अशी मागणी प्रा. मधुकर पाटील यांनी केली. शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेबाबत अधिसभेत प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यावरून सदस्यांनी अनेक उपप्रश्न उपस्थित केले.

#### अधिकाधिक प्रश्न विचारा

अधिसभेमध्ये प्रश्नांवर चर्चा करताना काही सदस्यांकडून प्रश्न विचारण्याऐवजी त्याबाबतची उदाहरणे दिली जात होती. यावेळी घटना तसेच प्रकार सांगण्यापेक्षा थेट प्रश्न विचारा, प्रश्नोत्तराचा तास महत्त्वाचा आहे. त्यामुळे अधिकाधिक प्रश्न व्हायला हवेत, असे आवाहन सभेचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सदस्यांना केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 MAR 2022 तरुण भारत

# रक्ताच्या कर्करोगावर आयुर्वेदिक औषधाची निर्मिती

## शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्रज्ञांना ऑस्ट्रेलियन पेटंट मंजूर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील वनस्पतीशास्त्रज्ञ विभागाचे डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. चिराग नारायणकर, डॉ. निवास देसाई यांनी रक्ताच्या कर्करोगावरील उपचारासाठी आयुर्वेदिक औषध निर्मिती केली आहे. या तीन शास्त्रज्ञांच्या रक्ताच्या कर्करोगारील उपचारासाठी तयार केलेल्या औषधासाठी ऑस्ट्रेलियन सरकारकडून औषधनिर्मिती पेटंट मंजूर झाले आहे.





डॉ. डी. के. गायकवाड डॉ. निवास देसाई डॉ. चिराग नारायणकर

विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. डी के गायकवाड आणि त्यांचे संशोधक विद्यार्थी डॉ. चिराग नारायणकर, डॉ. निवास देसाई, डॉ. मानसी पाटील (स. गा.म. कॉलेज कराड), डॉ. सागर देशमुख (न्यू कॉलेज, कोल्हापुर), डॉ. प्रतिष्ठा पवार (दा. पा. कॉलेज, कर्जत) व डॉ. उमेश पवार (पं. खे. कॉलेज, सावंतवाडी) यांना ऑस्ट्रेलिया सरकारकडून 'सिंथेसिस ऑफ ब्लड कॅन्सर सेल ग्रोथ इनहीबीटर" या विषयावरील औषधनिर्मितीमध्ये पेटंट मंजूर झाले आहे. रक्ताचा कर्करोग घातक आजार असून, त्यामुळे जगभरात लाखो लोक मृत्युमुखी पडतात. या भीषण रोगाला प्रतिरोध करणाऱ्या औषधनिर्मितीसाठी जगभरातील संशोधक प्रयत्न करत आहेत. या संशोधनाचा एक भाग म्हणून शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. डी. के. गायकवाड आणि त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांनी रक्ताच्या कर्करोगावरील आयुर्वेदिक औषधाची निर्मिती केली आहे. या संदर्भात माहिती देताना डॉ. डी.के. गायकवाड म्हणाले, सदर औषधामध्ये निवडुंग प्रजातीच्या वनस्पतीचा अर्क वापरला आहे. या आयुर्वेदिक औषधाच्या मदतीने रक्ताच्या कर्करोगाच्या उपचारावर चांगला पर्याय देण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. या सर्वांना भारत सरकारकडून दोन पेटंट मंजूर झाले आहेत. तसेच या टीमने कर्करोगावरील संशोधनासाठी अमेरिकेकडेही पेटंटसाठी प्रस्ताव पाठवला आहे. या चमूला कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत



# आजरा घनसाळ, काळा जिरगा वाणांच्या सुधारित जाती

▪ शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. एन. बी. गायकवाड यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

आजरा घनसाळ आणि काळा जिरगा मागणी असलेल्या तांदळांच्या सुगंधी वाणांच्या सुधारित जाती शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी तयार केल्या आहेत. या प्रजाती आता कर्जत येथील भात संशोधन केंद्राकडे दिल्या जाणार आहेत. दोन वर्षांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांना लागवडीसाठी उपलब्ध करून दिल्या जातील, अशी माहिती वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. एन. बी. गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्रा. गायकवाड आणि संशोधक विद्यार्थी शीतलकुमार देसाई व अकेश जाधव यांनी वाणांच्या अनुवांशिक गुणांमध्ये सुधारणा व उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने हाती घेतलेल्या संशोधन प्रकल्पांसाठी मुंबई डीएई–बीआरएनएसला ३२ लाख व नवी दिल्ली डीएसटी–एसईआरबीला ४० लाख रुपयांचा निधी मिळाला होता. विविध प्रकारच्या म्युटेजेनिक एजन्टचा वापर करून पिकांच्या सहा पिढ्यांच्या चाचण्या घेतल्या. अधिक उत्पादन, कमी उंची व लवकर परिपक्व आणि आडवे न पडणारे गुणधर्म असणारे वाण विकसित करण्यात संशोधकांना यश आले. ही बियाणे बहुस्थानिक चाचण्यांकरिता तयार आहेत. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वनस्पतीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. वर्षा जाधव, डॉ. व्ही. ए. बापट, डॉ. जी. बी. दीक्षित, डॉ. एस. आर. यादव उपस्थित होते.

### देशी वाणांच्या संशोधनात विद्यापीठ सक्रिय

देशी वाणांचे जतन व संवर्धन करण्यात विद्यापीठ सक्रिय आहे. वनस्पतीशास्त्रज्ञांचे आजरा घनसाळ व काळा जिरगा या सुगंधी वाणांचे संशोधन क्रांतीकारक आहे. सहा वर्षांच्या संशोधनाअंती वाणांचे रंग, वास, चव आणि पोषणमूल्ये असे मूळ गुणधर्म अबाधित राखून सुधारित वाण तयार करण्याची कामगिरी कौतुकास्पद आहे. डॉ. गायकवाड यांची आजरा घनसाळच्या भौगोलिक स्थान निश्चितीमध्ये महत्त्वाची भूमिका आहे.

**– कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के (शिवाजी विद्यापीठ)**

### ४८ देशी वाणांचे संकलन व संवर्धन

प्रा. गायकवाड आणि संशोधकांनी ९ सुवासिक आणि ३९ असुवासिक अशा ४८ भातांच्या देशी वाणांच्या प्रजाती संकलित केल्या आहेत. दोन वर्षांत कोल्हापूर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकरी, महिला आणि पुरूषांच्या बचत गटांना संवर्धन करण्यासाठी वितरीत केल्या. त्यासाठी डॉ. व्ही. ए. बापट, कृषी अधीक्षक, आजरा तालुका कृषी अधिकारी आणि आजरा घनसाळ संघ, आजरा यांच्यासह स्थानिक शेतकऱ्यांचे सहकार्य लाभले.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठासाठी १० कोटींचा निधी

♦ कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाला 'यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रशाला', 'राजर्षी शाहू महाराज संशोधन केंद्र व संग्रहालय संकुल' तसेच अन्य विभागांच्या आधुनिकीकरणाकरिता १० कोटी रूपये व मुंबई विद्यापीठाच्या लोकमान्य टिळक रत्नागिरी उपकेंद्रासाठी २ कोटी रूपये निधी देण्यात येईल. राज्यातील विद्यापीठांत थोर समाजसुधारक व महनीय व्यक्तींच्या नावे अध्यासन केंद्रे स्थापन करण्याबाबत धोरण निश्चित केले आहे. या प्रत्येक केंद्रासाठी ३ कोटी रूपये निधी देण्यात येणार आहे. नूतनीकरणासाठी मुंबई येथील सिडनहॅम,एल्फिन्स्टन महाविद्यालय, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, औरंगाबाद येथील शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील लक्ष्मीनारायण इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. सन २०२२–२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाला १ हजार ६१९ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.